नि.फौ.ख.क्र. ११/२०२४
निशाणी १६

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव – मंगेश लक्ष्मण गुरव
वय सुमारे – ५० वर्षे, व्यवसाय–हॉटेल व्यवसाय,
निवासस्थान–सध्या रा. जुना बुधवारपेठ, ता. करविर, जि. कोल्हापुर

**<u>सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती ए.ए.पवार यांच्या मार्फत सुरू</u>**

०१. माझा जन्म घोडगे–सोनवडे, तर्फ कळसुली, ता. कुडाळ येथे झाला असून मी काही दिवस माझे मुळ गावी, काही दिवस कोल्हापुर येथे असतो. घटनेच्यावेळी मी माझे मुळ गावी घोडगे–सोनवडे येथे आलो होतो. दि. २९/११/२०२३ रोजी सकाळी ९.३० वा. सुमारास मी माझी मेहुणी भाग्यश्री हीच्या घरामध्ये गेलो होतो. माझ्या मेहुणीचे घर वेतोबा मंदीर, कुशेवाडा येथे असुन मी त्यावेळी पाहिले की, माझ्या मेहुणीच्या घरातील २ लाकडी कपाटे ही काही व्यक्ती व आरोपी भरत हे नेत आहेत. माझ्या मेहुणीच्या घरातून मी पुढे मालवण येथे माझ्या मावशीच्या गावी गेलो होतो. मी माझ्या मेहुणीच्या घरी गेलो होतो त्यावेळी माझी मेहुणी ही मुंबईला त्यांच्या पतीचे ऑपरेशन असल्याने गेली होती. मी कोल्हापुर येथे आल्यानंतर जानेवारी महिन्यामध्ये माझ्या मेहुणीने मला फोन करून त्यांच्या घरी चोरी झाल्याचे सांगितले, त्यावेळी मी माझ्या मेहुणीस घटणेवेळी तेथे उपस्थित असल्याचे सांगितले. मी फोनवरून माझ्या मेहुणीस घटणेवेळी ४ लोक व आरोपी भरत हे २ कपाटे नेत असल्याचे देखील सांगितले. पोलीसांनी माझ्याकडे सदर घटनेबाबत चौकशी केली होती व माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब नोंदविला होता. आरोपी भरत हे आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास पूर्ण</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी.एम.सामंत यांचेमार्फत सुरू –</u>**

०२. माझे शिक्षण इयत्ता आठवी पर्यंत झाले आहे. मी माझ्या मेहुणीचे लग्न झाल्यापासून आरोपी भरत यांना ओळखतो. मी दि. २९/११/२०२३ ते १२/०१/२०२४ पर्यंत माझ्या मेहुणीस फोन लावला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दि. २९/११/२०२३ ते १२/०१/२०२४ पर्यंत मला माझ्या मेहुणीस फोन लावून सदरची घटना सांगण्यास कोणतीही अडचण नव्हती.

प्रश्न – दि. १२/०१/२०२४ ते १६/०३/२०२४ पर्यंत पोलीस स्टेशनला येऊन जबाब देण्यास तुम्हाला अडचण होती का?

उत्तर – माझा कोल्हापुर येथे व्यवसाय असल्याने व माझा मुलगा आजारी असल्याने मला दरम्यानच्या काळामध्ये वेळ मिळाला नाही.

०३. मी पोलीसांना जबाब देतेवेळी उशीर का झाला याचे वरीलप्रमाणे कारण सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबामध्ये सदरचे कारण नमुद नाही. मला ज्या घरातून चोरी झाली त्या घराचा नंबर अथवा सदरचे घर कोणाच्या मालकीचे होते ते माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेवेळी नेण्यात येणारी कपाटे ही कोणाच्या मालकीची आहेत हे मी सांगू शकत नाही. घोडगे–सोनावडे ते घटनास्थळ यामधील अंतर हे अंदाजे ५० कि.मी. इतके आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळी "४ व्यक्ती व आरोपी भरत दोन कपाटे नेत असल्याचे पाहिले आहे" हे सांगितले होते. (साक्षीदारला त्याचा जबाब दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबामध्ये सदरचे वाक्य नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी ही माझी मेहुणी असल्यामुळे तिला सहाय्य करण्याकरिता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील नमुद सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– १६/१२/२०२५

(एस.जे.चिवटे)

न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.